मूल्य : ५ रुपये

स्वामी स्वरूपानंद सह. पतसंस्था, रत्नागिरी यांचे मुखपत्र

# स्वरूप सहकार

जून २०२६



## स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था

## २० जून ते २० जुलै | मास ठेववृद्धीचा... मार्ग समृद्धीचा...

### परस्पर विश्वासाच्या अतूट नात्याचा समृद्ध करणारा प्रवास...

## ५०० कोटींच्या दिशेने वाटचाल



## ॲड. दीपक पटवर्धनांकडे राज्य पतसंस्था फेडरेशनची धुरा; रवींद्र चव्हाण यांच्याकडून सत्कार




महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी ॲड. दीपक पटवर्धन यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. तानाजीराव चोरगे यांनी त्यांचा सत्कार केला. त्या वेळी बँकेचे संचालक आणि अधिकारी उपस्थित होते.




भारतीय जनता पक्षाच्या रत्नागिरीत झालेल्या मेळाव्यात प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते ॲड. दीपक पटवर्धन यांचा सत्कार करण्यात आला. त्या वेळी ज्येष्ठ नेते डॉ. विनय नातू यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.



भाजप आमदार, सरचिटणीस योगेश सागर यांनी स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेला सदिच्छा भेट दिली.



भाजप आमदार प्रशांत ठाकूर यांची पतसंस्थेला भेट.




भाजप आमदार निरंजन डावखरे यांचेही ॲड. दीपक पटवर्धन यांनी पतसंस्थेत स्वागत केले.




२०२६-२७ हे 'बँक ऑफ महाराष्ट्र'कडून ठेववृद्धी वर्ष म्हणून साजरे केले जाणार आहे. त्या पार्श्वभूमीवर, बँकेच्या रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शाखा व्यवस्थापकांच्या आढावा बैठकीत मार्गदर्शन करण्यासाठी ॲड. दीपक पटवर्धन यांना आमंत्रित करण्यात आले होते.

## संपादकीय

# ठेवी ठेवू या, निसर्गही जपू या!

प्रति वर्षी २० जून ते २० जुलै हा ठेववृद्धी मास स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था आणि ठेवीदार मिळून महोत्सवी स्वरूपात साजरा करत आले आहेत. संस्था आणि ठेवीदार यांचे विश्वासाने गुंफले गेलेले नाते प्रत्येक ठेववृद्धी मासात अधिक गहिरे होत जाते. प्रत्येक ठेववृद्धी मासात हा अत्यंत भावूक अनुभव घेताना आस्थेने, आपुलकीने, विश्वासाने गुंतवणूक करणारा ठेवीदार आणि ठेव ठेवताना त्याच्या चेहऱ्यावरील समाधानाचे भाव पाहणे हे नवीन ऊर्जा देणारे क्षण माझ्या आयुष्यात मी सातत्याने अनुभवतो. अशी एक भावनिक, पण विश्वासार्ह बाजू असलेल्या प्रत्येक ठेववृद्धी मासापेक्षा अधिक काहीतरी असणारा हा ठेववृद्धी मास आहे.

सर्व सन्माननीय ठेवीदारांनी स्वकष्टाने अर्जित केलेला धनसंचय मोठ्या विश्वासाने स्वरूपानंद पतसंस्थेच्या ठेव योजनांमध्ये गुंतवून जो एक मोठा ठेवसंचय झालाय, तो या आर्थिक वर्षात ५०० कोटी रुपयांचा टप्पा पार करण्याएवढा झालाय. कोणत्याही आर्थिक संस्थेसाठी ५०० कोटींच्या ठेवी जमा करणे हे मोठे व्यावसायिक यश असतेच. त्याचबरोबर त्या संस्थेचे जनमानसातील स्थान अग्रमानांकित आहे हेही दाखवणारा हा टप्पा असतो. १० हजारांचे भागभांडवल ते ५०० कोटींच्या ठेवी हा टप्पा संस्थेच्या धोरणांचे, दिलेल्या ग्राहकसेवेचे, यशस्वी अर्थकारणाचे, उत्तम विश्वासार्ह प्रतिमेचे प्रतीक आहेच; पण त्याहीपेक्षा अधिक ठेवीदार सभासदांनी सातत्याने संस्थेवर दाखवलेल्या विश्वासाचे, संस्थेबद्दल ठेवीदार सभासदांमध्ये असलेल्या आस्थेचे, आपुलकीचे आणि स्वामी स्वरूपानंदांच्या नाममहात्म्याचेही आहे. या ठेववृद्धी मासात ५०० कोटींचा ठेवटप्पा अधिक समीप यावा, यासाठी जुन्या सर्व ठेवीदार सभासदांनी प्रत्येकी काही ठेव ठेवावी, ठेवीदार सभासदांनी ठेवलेल्या ठेवींचा आकडा यापेक्षाही आवर्जून ठेवलेली ठेव ही संस्थेला अधिक प्रेरणादायी ठरणार आहे. सर्व जुन्या ठेवीदारांनी आपले असे दोन नवे ठेवीदार आपला बहुमोल असा शब्द खर्च करून संस्थेशी जोडण्यासाठी 'स्वरूप सहकार'च्या माध्यमातून विनम्र आवाहन करण्याची संधी घेतो. त्याचबरोबर जेवढे नवे ठेवीदार संस्थेच्या ठेव योजनेत जोडले जातील, तेवढी नवीन झाडे वृक्षारोपण कार्यक्रमात सहभाग घेऊन लावली जातील आणि त्यांचे संगोपन केले जाईल. प्रति वर्षी या प्रत्येक झाडाचा वर्धापनदिनही साजरा केला जाईल. त्यायोगे नव्याने लावलेल्या प्रत्येक झाडाचे संगोपन, संरक्षण करण्याची जबाबदारी पार पाडणे व्यवस्थेला अनिवार्य होईल. निसर्गात समतोल राखण्यामध्ये वृक्षांचे महत्त्व आर्थिक गुंतवणुकीएवढेच महत्त्वाचे आहे, ही भावना प्रवाही करण्याचा हा संस्थेचा प्रयत्न असेल.

यंदा एकंदर जागतिक परिस्थितीमुळे आर्थिक स्थिती आव्हानात्मक आहे. या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनांचे महत्त्व आपण 'स्वरूप सहकार'च्या गेल्या अंकात पाहिले. स्वरूपानंद पतसंस्था नेहमीच आपली धोरणे अभ्यास करूनच ठरवते. त्यामुळेच संस्थेचे कामकाज सक्षमरीत्या सुरू असून, या वेळी ठेवीदारांकरिता थोडे अधिक व्याजदर जाहीर करण्यात आले आहेत. संस्थेने २० जून ते २० जुलै २०२६ या ठेववृद्धी मासात १२ ते १८ महिने मुदतीच्या स्वरूपांजली ठेव योजनेत सर्वसाधारण नागरिकांकरिता ८.७५ टक्के आणि महिला/ ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी ९ टक्के व्याजदर देऊ केला आहे. १९ ते ६० महिने मुदतीच्या सोहम ठेव (मासिक व्याज) योजनेमध्ये सर्वसाधारण नागरिकांकरिता ८.५० टक्के आणि महिला व ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी ८.७५ टक्के एवढा व्याजदर ठेवण्यात आला आहे. संस्थेचे कामकाज सातत्यपूर्ण, प्रमाणबद्ध, पारदर्शक आणि विश्वासार्ह असल्याने ठेवीदार स्वामी स्वरूपानंद संस्थेच्या ठेव योजनांशी जोडले जातात. यंदाही असाच चांगला प्रतिसाद मिळेल, याचा विश्वास वाटतो.

म्हणूनच जुन्या-नव्या सर्वच गुंतवणूकदारांचे स्वागत करण्यासाठी स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेची सर्वच शाखा कार्यालये आणि रत्नागिरी प्रधान कार्यालय सज्ज आहे. आकर्षक आणि तेवढ्याच विश्वासार्ह व्याजाच्या ठेव योजना घेऊन या ठेव महोत्सवात सर्वांचे स्वागत करण्यासाठी मन आतुर आहे. ५०० कोटींचा ठेवसंचय अगदी समीप असताना ते उद्दिष्ट गाठण्यासाठी सर्वांनी योगदान करावे आणि आपल्या स्वरूपानंद पतसंस्थेला ५०० कोटींच्या ठेवी असलेल्या संस्थांच्या वर्गात पदार्पण करण्यासाठी सहकार्य करावे, असे विनम्र आवाहन करत आहे.



**- ॲड. दीपक पटवर्धन,**
संपादक, स्वरूप सहकार

**वर्ष : १, अंक : ३.** RNI No. MHMAR/25/A4199. जून २०२६. *पाने १६. *किंमत ५ रुपये
'स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था म., रत्नागिरी जिल्हा' या पतसंस्थेचे 'स्वरूप सहकार' हे मासिक सिद्धिविनायक प्रिंटर्स, कारवांचीवाडी, रत्नागिरी' येथे छापून प्रेसिडेन्सी बिझनेस हाउस, एस. टी. स्टँडसमोर, रत्नागिरी – ४१५६१२ येथे प्रसिद्ध केले. **संपादक :** ॲड. दीपक मनोहर पटवर्धन. **कार्यकारी संपादक :** अनिकेत कोनकर. **मुद्रक, प्रकाशक :** ॲड. दीपक मनोहर पटवर्धन. **मांडणी आणि सजावट :** कोकण मीडिया, एटीएमएस ग्राफिक्स. **संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता :** प्रेसिडेन्सी बिझनेस हाउस, एस. टी. स्टँडसमोर, रत्नागिरी – ४१५६१२. **संपर्क :** (०२३५२) २२१२६३/२९५३६३. **वेबसाइट :** https://swaroopanandpatsanstha.com/ **ई-मेल :** swaroopsahakarrtn@gmail.com
**Volume : 1, Issue : 3. June 2026**
This Monthly Swaroop Sahakar printed and published by Adv. Deepak Manohar Patwardhan, on behalf of Swami Swaroopanand Sahakari Patsanstha Ltd., Ratnagiri and printed at Siddhivinayak Printers, Karwanchiwadi, Ratnagiri and published at Presidency Business House, Opp. S. T. Stand, Ratnagiri – 415612. **Editor :** Adv. Deepak Manohar Patwardhan. **Executive Editor :** Aniket Konkar

महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांची बिनविरोध निवड झाली. त्यानंतर अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले. ते रत्नागिरीत परतल्यावर नगर वाचनालयात त्यांचे स्वागत आणि सत्काराचा एक छोटा समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्याची ही क्षणचित्रे... (वृत्त पान क्रमांक 5वर...)



























# पतसंस्था चळवळ अधिक विश्वासार्ह, कार्यक्षम होण्याकरिता कार्य करणार : ॲड. दीपक पटवर्धन

## राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड



रत्नागिरी : राज्यातील सर्व पतसंस्थांची शिखर संस्था असलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी रत्नागिरीचे सुपुत्र, स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली रत्नागिरीतील स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था अत्यंत शिस्तबद्ध आणि पारदर्शक कारभार करून सातत्यपूर्ण उत्तुंग कामगिरी पतसंस्था म्हणून नावारूपाला आली आहे. असे सक्षम आणि स्वच्छ प्रतिमा असलेले नेतृत्व आता राज्यातील १९ हजार पतसंस्थांच्या शिखर संस्थेला लाभल्याने सर्वत्र आनंद व्यक्त होत आहे. ॲड. पटवर्धन यांनी याआधी फेडरेशनचे तज्ज्ञ संचालक आणि कार्याध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळली आहे.

'पतसंस्था चळवळ अधिक विश्वासार्ह आणि कार्यक्षम होण्याकरिता नियमांची काटेकोर अंमलबजावणी, संचालक मंडळाकडून डोळसपणे काम होणे आणि नेमक्या नोंदी ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. त्या दृष्टीने अभ्यासपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रम तयार करून राज्यभर राबवण्याचा प्रयत्न केला जाईल,' असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे नवे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी केले. १२ जून रोजी पुण्यात झालेल्या निवडणूक प्रक्रियेनंतर १३ जून रोजी ते रत्नागिरीत आले. त्या वेळी रत्नागिरी नगर वाचनालयात त्यांचे स्वागत आणि सत्कार करण्यात आला. या वेळी पतसंस्थेचे संचालक, अधिकारी-कर्मचारी, जिल्हा फेडरेशनचे उपाध्यक्ष संतोष थेराडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष झालेले ॲड. पटवर्धन हे पहिलेच रत्नागिरीकर आहेत. ते अनेक वर्षे सहकार क्षेत्रात कार्यरत असून, रत्नागिरी जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनचेही ते अध्यक्ष असून, सध्या ते राज्य पतसंस्था फेडरेशनचे कार्याध्यक्ष होते.

या वेळी झालेल्या पत्रकार परिषदेत ॲड. दीपक पटवर्धन म्हणाले, 'आजच्या प्रगत बँकिंगच्या युगातही राज्यात १९ हजारांहून अधिक पतसंस्था कार्यरत आहेत. म्हणजेच या चळवळीवर लोकांचा प्रचंड विश्वास आहे. ती चळवळ अधिक विश्वासार्ह आणि कार्यक्षम बनवण्याच्या दृष्टीने आवश्यक ते उपक्रम राबवण्याचा माझा प्रयत्न असेल. राज्यातील सहकारी पतसंस्थांच्या प्रशिक्षणासाठी सध्या शिर्डीत चांगले केंद्र आहे; मात्र व्याप्ती वाढवण्याच्या दृष्टीने मध्यवर्ती आणि विभागवार उपकेंद्रे उभारण्याची माझी संकल्पना असून, रत्नागिरी किंवा गणपतीपुळ्यात एक मोठे कायमस्वरूपी प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा मानस आहे. पतसंस्था चळवळीत चांगले घटक स्थिरावावेत यासाठी हे सारे प्रयत्न केले जातील.'

### फेडरेशनच्या कार्याची व्याप्ती

'या निवडणुकीमध्ये सर्व २१ संचालकांना उभे राहण्याची संधी होती; पण सर्वांनी मिळून बिनविरोध माझी निवड केली. गेली जवळजवळ २० वर्षे मी पतसंस्था फेडरेशनचा संचालक म्हणून कार्यरत आहे. महाराष्ट्रातील तीन हजारांपेक्षा अधिक पतसंस्था या फेडरेशनशी संलग्न आहेत. पतसंस्था चळवळीचा आवाज म्हणून या फेडरेशनकडे पाहिले जाते. पतसंस्थांचे वेगवेगळे प्रश्न, नवीन कार्यक्रम किंवा नवीन तंत्रज्ञान, या सगळ्या संदर्भात फेडरेशनने सातत्याने काम करणे अपेक्षित असते. सहकार कायद्यातील तरतुदीप्रमाणे सर्व संस्थांनी त्यांच्या संचालकांसाठी, कर्मचाऱ्यांसाठी आणि सभासदांसाठी प्रशिक्षण आयोजित करणे आवश्यक असते. फेडरेशन ही शासनमान्य प्रशिक्षण संस्था आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रभर विविध पद्धतीची प्रशिक्षण शिबिरे फेडरेशनच्या माध्यमातून घेतली जातात. वसुली कारवाईच्या संदर्भात प्राप्त होणारा १० चा दाखला संस्थांना प्रदान करण्यासाठी एक वेगळी व्यवस्था फेडरेशनच्या माध्यमातून केलेली आहे. सहकार खात्याचे सहायक निबंधक दर्जाचे अधिकारी डेप्युटेशनवर या फेडरेशनमध्ये काम करतात. विशेष वसुली अधिकारी फेडरेशनच्या माध्यमातून १०१च्या दाखल्यांवर कार्यवाही करून वसुली करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर फिरत असतात. पतसंस्था चळवळीला पोषक आणि मार्गदर्शक ठरेल असे काम करणे, त्यांचे प्रश्न हिरिरीने शासन दरबारी मांडणे आणि त्याची निर्गत करून घेणे, असे काम हे फेडरेशन करते,' असे ॲड. पटवर्धन यांनी सांगितले.

### पतसंस्थांचे महत्त्व

'पतसंस्थांचे जाळे संपूर्ण महाराष्ट्रभर पसरलेले आहे. १९,९७८ नागरी आणि पगारदार

# पुण्यात झाली निवडणूक प्रक्रिया

महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे आधीचे अध्यक्ष काका कोयटे यांनी राजीनामा दिल्यामुळे अध्यक्षपदासाठी निवडणूक झाली. निवड प्रक्रियेवेळी पतसंस्था फेडरेशनचे मुख्य प्रवर्तक वसंतराव शिंदे, माजी अध्यक्ष काकासाहेब कोयटे, उपाध्यक्ष डॉ. शांतिलाल शिंगी, महासचिव शशिकांत राजोबा, ज्येष्ठ संचालक दादाराव तुपकर यांच्यासह राज्यभरातील सर्व संचालक उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून मिलिंद टांकसाळे (उपनिबंधक, पुणे शहर १) यांनी काम पाहिले. ॲड. पटवर्धन यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली. त्यांना १६ महिन्यांचा कार्यकाळ मिळणार



आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे यांनी ॲड. पटवर्धन यांचे अभिनंदन करताना सध्याच्या आर्थिक परिस्थितीवर भाष्य केले. ‘युद्धजन्य परिस्थिती आणि इंधनाच्या वाढत्या दरांमुळे अर्थव्यवस्थेसमोर आव्हानात्मक परिस्थिती निर्माण झाली असून, त्याचा परिणाम पतसंस्था क्षेत्रावरही होत आहे. अशा काळात राज्यभरातील सुमारे १९ हजार पतसंस्थांना योग्य मार्गदर्शन आणि सक्षम नेतृत्व मिळाले आहे,’ अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

या निवडीबद्दल राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार किरण सामंत, मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष आणि आमदार प्रवीण दरेकर, सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी, तसेच आमदार प्रसाद लाड यांनी ॲड. दीपक पटवर्धन यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

पतसंस्था या फेडरेशनच्या छत्राखाली काम करतात. सुमारे सहा कोटी सभासद म्हणजेच महाराष्ट्राच्या लोकसंख्येच्या ५० टक्के नागरिक या चळवळीशी जोडलेले आहेत, इतकी ही चळवळ महत्त्वाची आहे. सध्याच्या आकडेवारीप्रमाणे ९०,५०० कोटी रुपयांच्या ठेवी या पतसंस्थांकडे जमा आहेत. १२०० कोटींचे भांडवल या चळवळीमध्ये नव्याने निर्माण होत आहे. आज प्रगत बँकिंगचे युग आहे. राष्ट्रीयीकृत बँका, अर्बन बँका, खासगी बँका आणि स्मॉल फायनान्स बँकांचे मोठे जाळे असूनही, महाराष्ट्रात १९ हजारांहून जास्त पतसंस्था कार्यरत आहेत. म्हणजेच या व्यवस्थेवर जनसामान्यांचा प्रचंड विश्वास आहे,’ असे ॲड. पटवर्धन म्हणाले.

## राज्याच्या सहकार क्षेत्रात कोकणाचा आवाज

‘कोणतीही व्यवस्था चालवण्यासाठी त्यामध्ये काम करणाऱ्या व्यक्ती विश्वासार्ह असणे आवश्यक असते. विश्वास हा केवळ वर्तनातूनच नाही, तर तुमच्या ज्ञानावर आणि माहितीवरही अवलंबून असतो. फेडरेशन ही शिखर संस्था म्हणून पतसंस्थांना एकत्र करून त्यांना मार्गदर्शन करण्याचे आणि शासन दरबारी आवश्यक परिपत्रके निघावीत यासाठी काम करत आहे. या फेडरेशनमध्ये अनेक दिग्गज संचालक काम करतात. आशियातील सर्वांत मोठ्या बुलढाणा अर्बन संस्थेचे अध्यक्ष राधेश्याम चांडक हेसुद्धा या फेडरेशनचे संचालक आहेत. अशा दिग्गज मंडळींसोबत काम करण्याची आणि रत्नागिरीतून जाऊन अध्यक्षपदी बसण्याची संधी मला मिळाली आहे. कोकणात सहकार क्षेत्र प्रगत नाही असे म्हटले जाते; पण या संधीमुळे महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रात कोकणाचा आवाज दुमदुमतोय असे म्हणता येईल. या संधीचा उपयोग करून ही चळवळ अधिक विश्वासार्ह, अद्ययावत आणि कार्यक्षम करण्यासाठी मी नक्की प्रयत्न करीन,’ अशी ग्वाही पटवर्धन यांनी दिली.

## रत्नागिरीत प्रशिक्षण केंद्रासाठी प्रयत्न

‘सहकार कायद्याच्या ‘सेक्शन २४’मध्ये प्रशिक्षणाची आवश्यकता नमूद केलेली आहे. केवळ पतसंस्थाच नव्हे, तर दोन लाख सहकारी संस्थांमधील संचालक, कर्मचारी आणि सभासदांसाठी प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. काही मोठ्या बँका आणि संस्थांना सोबत घेऊन रत्नागिरीत एक मोठे प्रशिक्षण केंद्र उभे राहावे,’ असा मनोदय त्यांनी बोलून दाखवला.

## अंशदानाचा प्रश्नावर तोडगा निघण्यासाठी...

‘अंशदान या विषयावर सहकार खात्याने केलेल्या तरतुदींमध्ये अनेक त्रुटी आहेत. २०१७पासून यावर अनेक परिपत्रके निघाली आणि विरोधामुळे त्यांवर स्थगितीही आली. हा प्रश्न कायमस्वरूपी सुटावा आणि सहकार चळवळीला पूरक यंत्रणा निर्माण व्हावी, यासाठी आम्ही शासनाकडे प्रकर्षाने मागणी करणार आहोत,’ असेही त्यांनी सांगितले.

## अभ्यासक्रम तयार करणार

‘पतसंस्था चळवळ अधिक विश्वासार्ह बनवण्यासाठी नियम पाळणे आणि संचालक मंडळाने डोळसपणे काम करणे गरजेचे आहे. रेकॉर्ड कीपिंग आणि डॉक्युमेंटेशनवरही विशेष लक्ष देण्याची गरज आहे. त्याकरिता संपूर्ण वर्षाचा एक अभ्यासपूर्ण सिलॅबस तयार करून तो महाराष्ट्रभर राबवण्याचा आमचा प्रयत्न राहील. पतसंस्था चळवळीमध्ये चांगले आणि चारित्र्यवान घटक स्थिरावावेत, हा यामागचा उद्देश आहे,’ असे ते म्हणाले.

संतोष थेराडे म्हणाले, ‘पतसंस्था फेडरेशनचा अध्यक्ष होणे हे खूप मोठे आणि कठीण काम आहे. ही रत्नागिरी जिल्ह्यासाठी अभिमानाची आणि कौतुकाची गोष्ट आहे. रत्नागिरी जिल्ह्याचे नाव पूर्ण महाराष्ट्रात सहकार चळवळीमध्ये गाजत आहे, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. पटवर्धन यांना पतसंस्थांच्या अडचणींचे पूर्ण आकलन आहे आणि या क्षेत्रात काम करण्याची मोठी संधी त्यांच्याकडे आहे. त्यांनी पूर्ण जिल्ह्यात आणि महाराष्ट्रातही प्रशिक्षण वर्गांमध्ये कायद्याविषयी आणि संस्थाचालक-कर्मचाऱ्यांनी कशा पद्धतीने काम करावे, यावर नेहमी मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन त्यांना हे अध्यक्षपद मिळाले आहे.’

# ठेववृद्धी मास म्हणजे एक उत्सवच!

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचा ठेववृद्धी मास हा खातेदारांकरिता आणि अर्थातच कर्मचाऱ्यांसाठीही जणू एक उत्सवच असतो. संस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांच्या खंबीर नेतृत्वामुळे ठेववृद्धी मास ही संकल्पना लोकप्रिय झाली आणि दिवसेंदिवस तिची लोकप्रियता वाढतच आहे. 'पटवर्धन साहेबांमुळे आम्ही निश्चिंतपणे आमचे पैसे स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेत गुंतवतो,' अशी बहुतांश ठेवीदारांची भावना आहे. पतसंस्थेची मारुती मंदिर शाखा १२ जून २०१६ रोजी सुरू झाली. तिथपासून १० वर्षांत या शाखेने ७० कोटी रुपयांच्या ठेवींचा टप्पा ओलांडला. ॲड. पटवर्धन यांच्या नेतृत्वाबद्दल खातेदारांच्या मनात असलेल्या विश्वासामुळेच हे शक्य झाले.



**धनंजय वळंजू**
शाखाधिकारी,
मारुती मंदिर शाखा,
रत्नागिरी

२० जून ते २० जुलै हा ठेववृद्धी मास, दसरा-दिवाळी ठेव योजना आणि नववर्ष स्वागत ठेव योजना अशा तीन योजना संस्थेकडून दर वर्षी राबवल्या जातात. त्या कालावधीत दर वर्षी नवनवे सभासद पतसंस्थेशी जोडले जातात. त्या योजना किती लोकप्रिय आहेत, याबद्दल सांगायचे झाले, तर योजना सुरू होण्याआधीपासूनच खातेदारांच्या गुंतवणुकीचा ओघ सुरू होतो. यावरून ठेवीदारांचा उत्साह लक्षात येतो. अनेक खातेदार असे आहेत, की त्यांचे वडीलही संस्थेचे सभासद होते आणि आता ते आपल्या मुलांनाही या पतसंस्थेमध्ये गुंतवणूक करायला सांगतात. संस्थेची सुरक्षितता आणि विश्वासार्हता यांमुळेच अशा प्रकारे तीन-तीन पिढ्या एकाच संस्थेशी जोडलेल्या राहू शकतात. अनेक खातेदार आपल्या मुलांच्या भविष्यातील शैक्षणिक आणि अन्य गरजांसाठीची तरतूद म्हणूनही स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेतील ठेवींचा पर्याय निवडतात. आजच्या काळात म्युच्युअल फंडसह गुंतवणुकीचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. तरीही स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेतील ठेवींचे प्रमाण वाढते आहे. संस्थेची विश्वासार्हता आणि पैशांच्या सुरक्षिततेची खात्री यांमुळेच हे शक्य होते.

स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेतील मुदत ठेवीचे वैशिष्ट्य म्हणजे खातेदारांना काही कारणाने तातडीची आर्थिक गरज भासल्यास मुदत ठेव तातडीने मोडून लगेच पैसे उपलब्ध करून दिले जातात. त्यामुळे त्यांचा विश्वास दृढ होतो. ग्राहकांचा हा विश्वास असाच कायम राहील, यासाठी पतसंस्था परिवार सदैव कार्यरत असतो. यंदाच्या ठेववृद्धी मासातही अधिकाधिक ठेवीदारांचे स्वागत करण्यासाठी आम्ही सज्ज आहोत.

# सातत्याने उत्तम प्रतिसाद

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचा रत्नागिरी जिल्ह्यात चांगला विस्तार झाल्यानंतर संस्थेची सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पहिली शाखा १५ जून २०१९ रोजी संस्थेची देवगड-जामसंडे येथे सुरू झाली. अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन सुरुवातीपासून घेत असलेले कष्ट आणि त्यातून होत असलेला संस्थेचा विस्तार याचे रत्नागिरी जिल्हावासीय साक्षीदार होते. पारदर्शक, शिस्तबद्ध कारभारामुळे विश्वासार्ह पतसंस्था अशी प्रतिमा तयार झाली. सिंधुदुर्गात मात्र अन्य एका पतसंस्थेच्या अत्यंत वाईट अनुभवामुळे येथील नागरिक पतसंस्थेत ठेवी ठेवण्यास उत्सुक नव्हते. या पार्श्वभूमीवर, मी (मुकेश लिमये) आणि माझे सहकारी सुयश मराठे यांनी सुरुवातीच्या काळात घरोघरी जाऊन लोकांच्या व्यक्तिशः भेटीगाठी घेऊन स्वरूपानंद पतसंस्थेची, तिच्या वेगळेपणाची माहिती द्यायला सुरुवात केली. त्यांचे रत्नागिरी जिल्ह्यातील नातेवाईक आणि परिचितांकडूनही स्वरूपानंद पतसंस्थेविषयी जाणून घेऊन ठेवी ठेवण्याचे आवाहन केले. हळूहळू इथल्या लोकांनीही स्वरूपानंद पतसंस्थेवर विश्वास ठेवून ठेवी ठेवायला सुरुवात केली आणि या शाखेच्या कार्याची व्याप्तीही वाढू लागली. कर्जाचीही मागणी होऊ लागली. ती मागणी पूर्ण करण्यात आली. एकंदरीतच, ठेवी आणि कर्जवितरण यांचे चक्र सुरळीतपणे सुरू झाले. ताज्या आकडेवारीनुसार देवगड शाखेकडे साडेसात कोटी रुपयांहून अधिक ठेवी असून, सुमारे १० कोटी रुपयांचे कर्जवितरण झाले आहे.



**मुकेश पांडुरंग लिमये**
शाखाधिकारी,
देवगड शाखा

ठेववृद्धी मासात ठेवीदारांचा चांगला प्रतिसाद मिळतो. १०-१२ हजार रुपयांच्या ठेवींपासून हा प्रवास सुरू झाला आणि २०२५च्या ठेववृद्धी मासात तब्बल दीड कोटी रुपयांच्या ठेवी जमा झाल्या. २०२४च्या ठेववृद्धी मासात सुमारे ७५ लाख रुपयांच्या ठेवी जमा झाल्या होत्या. एकंदरीतच, दर वर्षी ठेववृद्धी मासाला मिळणाऱ्या प्रतिसादात वाढच होत आहे.


देवगडमध्ये शाखा सुरू झाल्यापासून सातही वर्षे या शाखेचा एनपीए शून्य असून, लॉकडाउनमध्येही या शाखेत १०० टक्के वसुली झाली होती. आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आपत्कालीन वैद्यकीय परिस्थितीचे किंवा यंदा आंब्याचे उत्पादन कमी झाल्याचे कारण वगळता या शाखेत ठेवलेल्या ठेवी कोणाही ठेवीदाराने काढलेल्या नाहीत. ठेवीदारांचा उत्तम प्रतिसाद असल्याने ठेवींमध्ये सातत्याने वाढच होत आहे.

# ठेववृद्धी मासाची लोकप्रियता गाठतेय नववी शिखरे!

**दर वर्षीप्रमाणेच यंदाही स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेत 20 जून ते 20 जुलै या कालावधीत ठेववृद्धी मास उपक्रम राबवला जात आहे. त्या निमित्ताने, या उपक्रमाचा घेतलेला हा आढावा...**


स्वामी स्वरूपानंद पतसंस्था आणि गुंतवणूकदारांचा एकमेकांवरचा विश्वास आणि स्नेहाचा आविष्कार घडवणारा ठेवींचा महोत्सव म्हणजे ठेववृद्धी मास. स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेने गेली ३५ वर्षे सहकार चळवळीत कमालीचे सातत्य ठेवून उत्तम काम करण्याचा प्रयत्न केला. अर्थकारणात शिस्त आणि प्रमाणबद्धता आवश्यक असते, हे नेमके ओळखून संस्थेने विश्वासार्हता, शिस्त आणि प्रमाणबद्धता राखून सातत्यपूर्ण वाटचाल केली. अनेक प्रगतिशील संकल्पना राबवल्या. आपल्या प्रशासन व्यवस्थेवर कार्यक्षम व्यवहार आणि आचरणाचे संस्कार केले. त्यातून स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचे अर्थविश्व उमलले आणि बहरत गेले. विविध उपक्रम आणि विविध प्रयोगशील योजनांमधील एक अत्यंत लोकप्रिय ठरलेली आणि संस्थेलाही फलदायी ठरलेली योजना म्हणजे ठेववृद्धी मास. प्रति वर्षी २० जून ते २० जुलै हा स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचा ठेववृद्धी मास असतो. या उपक्रमाची लोकप्रियता सातत्याने नववी शिखरे गाठत आहे.

ठेववृद्धी मासात पतसंस्थेच्या सर्वच शाखांमध्ये अत्यंत उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण असते. संस्थेची सुरुवात झाली, तेव्हा



कर्जवितरणासाठी पैसा नव्हता. म्हणून मित्रपरिवारात फिरून काही रक्कम गोळा केली. खरे तर या प्रयत्नांतूनच ठेववृद्धी मासाची संकल्पना पुढे आली. पहिल्या घोषित ठेववृद्धी मासात तीन लाख रुपये जमले आणि गेली ३१ वर्षे हा ठेववृद्धीचा महोत्सव प्रति वर्षी अत्यंत उत्साहात, प्रचंड प्रतिसादासह नवनवीन गुंतवणूकदारांना जोडत सुरू आहे. गेल्या वर्षी म्हणजे २०२५च्या ठेववृद्धी मासात १९२४ नवीन खात्यांच्या माध्यमातून ३०.०८ कोटी रुपयांच्या नवीन ठेवी या महिन्यात ठेवल्या गेल्या. तीन लाख ते ३० कोटी या वाटचालीत काही वर्षांमध्ये काही वेळा कोविडसारख्या कारणांमुळे ठेवींची संख्या थोडी कमीही झाली; मात्र कोणत्याही वर्षीचा ठेववृद्धी मास प्रतिसादाविना गेला नाही. ग्राहकांचा भरभरून प्रतिसाद हेच या ठेववृद्धी मासाचे वैशिष्ट्य आहे. ठेवीदार, संचालक, कर्मचारी या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांतून हे यश प्राप्त झाले आहे. ठेवी गोळा करण्याच्या बाबतीत अन्य कोणत्या संस्थेशी नव्हे, तर स्वरूपानंद संस्थेच्याच सर्व शाखांमध्ये निकोप स्पर्धाही असते. हे व्यावसायिकतेचे प्रतीक आहे.

सुरुवातीला रत्नागिरी तालुका कार्यक्षेत्र असणारी संस्था असल्याने येथील अर्थकारण लक्षात घेऊन हा ठेववृद्धी मास जून-जुलै महिन्यात घेण्याचे आम्ही ठरवले. ‘मनात आले आणि घोषित केले,’ असा हा मास नाही. रत्नागिरीतील अर्थकारण आंबा पिकावर विसंबून असण्याचा तो कालखंड होता. २० जून ते जुलै या कालावधीत आंबा व्यावसायिकांचे हिशेब पूर्ण होत आणि तो पैसा हातात आलेला असे. जूनच्या पहिल्या




## ठेववृद्धी मासातील ठेवींची आकडेवारी

| वर्ष | नव्या ठेवी | खात्यांची संख्या |
|---|---|---|
| १९९५ (पहिला घोषित ठेववृद्धी मास) | ३ लाख | |
| २०१६ | ६.८५ कोटी | ७७८ |
| २०१८ | ६.९९ कोटी | ८८२ |
| २०१९ | ११.४३ कोटी | ९०१ |
| २०२१ | १३.१६ कोटी | १०३९ |
| २०२३ | १८.५५ कोटी | १३६६ |
| २०२५ | ३०.०८ कोटी | १९२४ |

## ठेववृद्धी मासात ठेवलेल्या नवीन आणि नूतनीकृत ठेवी

| वर्ष | रक्कम | एकूण खाती |
|---|---|---|
| २०२४ | ९७.२५ कोटी | ८१८३ |
| २०२५ | ११२.३० कोटी | ९३०३ |

पंधरवड्यात शेतीची कामे उरकलेली असतात. शेतकरी, बागायतदार थोडे निवांत असतात. म्हणून ठेववृद्धी मासासाठी हा कालखंड निवडला. स्वामींच्या कृपेने ठेववृद्धी मास प्रचंड यशस्वी ठरत गेला. मच्छिमारांच्या दृष्टीनेही हा कालखंड महत्त्वाचा असतो.

३०-३१ वर्षांपूर्वी संस्थेचे काम अगदी बाल्यावस्थेत होते. संस्थेची ओळख नव्हती; मात्र सातत्याने संस्थेचा विषय घेऊन समाजात जाणे, आप्त-स्वकीय, स्नेही यांना संस्थेची माहिती देऊन त्यांना ठेव ठेवण्याची गळ घालून, त्यांना त्यासाठी तयार करून, त्यांना घेऊन त्यांच्या मित्रपरिवारात ठेवी गोळा करण्यासाठी जाणे असा परिपाठ सुरू केला. गावागावात जाऊन संस्थेची माहिती देऊन, संस्थेची योजना समजावून सांगून, एक हजार ते पाच हजार, क्वचित प्रसंगी १० ते २५ हजार रुपयांच्या ठेवी गोळा करत दिवस दिवस फिरायचो. संध्याकाळी हिशेब केल्यावर जमा झालेल्या ठेवी पाहून अनेक वेळा हरखून जायला होई, तर अनेकदा निराशाही पदरी पडे; पण व्रतस्थ भूमिकेतून हे अभियान राबवले आणि त्याचे दृश्य परिणाम दिसू लागले. अनेक गावे, अनेक घराणी संस्थेशी कायमची जोडली गेली. ठेववृद्धी मासात लाखांचे आकडे मागे पडून कोटींच्या ठेवी जमू लागल्या. १० कोटी रुपयांचा पल्ला पार होऊन २० कोटींच्या नजीक ठेवी जमू लागल्या. ठेववृद्धी मासाची लोक वाट पाहू लागले. पैसे हाती आले, तर मे महिन्यापासूनच ठेवीदार स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेतील बचत खात्यात पैसे जमा करू लागले. लोकप्रियता वाढत गेली आणि ठेववृद्धी मासाला महोत्सवाचे स्वरूप आले.

ठेववृद्धी मासात जनसंपर्कातून ठेवीदारांना संस्थेबाबतची माहिती देऊन त्यांना ठेव ठेवण्यासाठी उद्युक्त केले जाते आणि संस्थेच्या प्रगतीचा आलेख संभाव्य ठेवीदारांसमोर मांडला जातो. त्यातून एकेक ठेवीदार, मग त्याचे कुटुंब, मग स्नेही असे संस्थेचे ठेवीदार होत गेले. स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेची आर्थिक स्थिती अभ्यासली, तर सहज नजरेत भरते, ते ९९ टक्क्यांपेक्षा अधिक असलेले कर्जवसुलीचे सातत्यपूर्ण प्रमाण. तसेच संस्थेचा वाढता निव्वळ नफा, संस्थेची सातत्याने प्रमाणबद्ध पद्धतीने वाढणारी बँक गुंतवणूक, संस्थेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण २८.५५ टक्के इतके विक्रमी असणे या गोष्टी महत्त्वपूर्ण आहेत. या सर्वांबरोबरच संस्थेचा स्वच्छ, पारदर्शक तोंडवळा हीदेखील महत्त्वाची बाब आहे. संस्था न चुकता दर वर्षी ३१ मार्च रोजी म्हणजे आर्थिक वर्षाच्या अखेरच्या दिवशीच आपली आर्थिक स्थिती जाहीर करते. या सर्वांबरोबरच वेळोवेळी माध्यमांमध्ये आर्थिक स्थितीबाबत दिलेली माहिती, राबवलेले बहुविध उपक्रम, त्यामुळे ग्राहक आणि संस्था यांच्यामध्ये निर्माण झालेले सौहार्दाचे वातावरण या सर्वांतून ठेवीदारांना संस्थेबाबतचा विश्वास प्राप्त झाला. आज एवढी यशप्राप्ती झाल्यानंतरही संपर्क अभियान मिशन मोडवर राबवले जाते, हे संस्थेचे वैशिष्ट्य आहे.

संस्था ठेववृद्धी मासात ठेवींवरचे व्याजदर थोडे वाढवते. अगदी सुरुवातीच्या काळात त्या वेळच्या स्थितीनुसार १४ ते १६ टक्के एवढा व्याजदरही दिला गेला होता. संस्थेला स्थिरता येत गेली आणि अर्थकारणाचे मर्म अधिक उमगत गेले. संस्थेने आपली धोरणे कायम अभ्यास करूनच ठरवली. ठेवीच्या व्याजदरांचे आकर्षण वाढवून ठेवीदारांना आकृष्ट करण्याचे धोरण संस्थेने कधीच अंगीकारले नाही. आर्थिक स्थिती, आपली गरज, कर्जवितरणाचा वेग, निश्चित केलेली आपली उद्दिष्टे यांचा साकल्याने अभ्यास करून संस्था आपले व्याजदर सहकार खात्याच्या धोरणांना अनुसरून ठरवत आली आहे. अतिरिक्त व्याजदर देणे म्हणजे धोका वाढवणे. त्यापेक्षा संयत व्याजदर देऊन सुरक्षितता मात्र वाढवत नेऊन ठेवी संरक्षित ठेवाव्यात आणि ठरलेला व्याजपरतावा वेळीच देता यावा, असे धोरण संस्थेने स्वीकारले. ठेवीदारांनीही या धोरणाचे स्वागत केले आणि संस्थेच्या ठेव योजनांना प्रतिसाद दिला. म्हणजेच धोकादायक अतिरिक्त व्याज देऊन ठेवी आकृष्ट न करता आर्थिक गणिते मांडून नेमके नियोजन करून संस्था सातत्याने त्यानुरूप ठेवींचे व्याजदर देते. त्यामुळे ठेवी सुरक्षित राहतात, हा विश्वास ठेवीदारांना वाटतो. म्हणून ठेवीदार स्वामी स्वरूपानंद संस्थेच्या ठेव योजनांशी संलग्न होतो.

स्वरूपानंद संस्थेकडे सद्यस्थितीत ४१३.५९ कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. त्यापैकी १७२.५३ कोटी रुपये संस्थेने विविध बँकांमध्ये गुंतवले आहेत. ३५ वर्षांच्या मंथनातून संस्थेने ५४.६४ कोटी रुपयांचा भरभक्कम स्वनिधी निर्माण केला आहे. ३०८.३० कोटी रुपयांची कर्जे संस्थेने वितरित केली आहेत. त्यांची वसुली ९९.७४ टक्के असून, संस्थेचा एनपीए गेली १६ वर्षे शून्य टक्के आहे. संस्थेचा लेखापरीक्षण वर्ग सातत्याने 'अ' राहिला असून, अशा उत्तम स्थितीमुळे संस्थेला महाराष्ट्र शासनाचा सहकारभूषण पुरस्कार, राष्ट्रीय सहकार निगमचा उत्कृष्ट संस्था पुरस्कार, राज्य फेडरेशनचा दीपस्तंभ पुरस्कार, 'बँको'चा बँको ब्लू रिबन असे अनेकविध पुरस्कार वेळोवेळी मिळाले आहेत.

या वर्षीही २० जून ते २० जुलै या ठेववृद्धी मासात तीन योजना घेऊन संस्था ठेवींसाठी साद घालत आहे. या योजनांमध्ये अधिकाधिक ठेव गुंतवून ठेवीदारांनी आकर्षक व्याजपरताव्याचा लाभ घ्यावा, असे विनम्र आवाहन करत आहे.

संस्थेचे संचालक, अधिकारी, कर्मचारी, रोजठेव प्रतिनिधी आपल्याशी संपर्क साधतील. आपणही संस्थेच्या १७ ठिकाणी असलेल्या शाखांशी संपर्क साधून ठेव योजनांची माहिती घेऊन आपली अनमोल ठेव संस्थेत गुंतवावी. २०२६-२७ या आर्थिक वर्षात ५०० कोटींचा टप्पा पार करण्याचा संकल्प केला आहे. आपल्या सर्वांचे सहकार्य, स्नेह आणि विश्वास, तसेच स्वामींच्या आशीर्वादाने स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेची यशस्वी अर्थगाथा अधिक द्रुतगतीने अग्रेसर होईल, असा विश्वास वाटतो.

**- ॲड. दीपक पटवर्धन**
अध्यक्ष,
स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था

# ग्राहक आतुरतेने वाट पाहतात ठेववृद्धी मासाची!

कोकणातील माणसे गणपती आणि शिमगा या उत्सवांची वाट पाहत असतात, अगदी त्याचप्रमाणे स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे ग्राहक, सभासद आणि हितचिंतक ठेववृद्धी मासाची आतुरतेने वाट पाहत असतात. गेली आठ वर्षे मी पतसंस्थेत काम करतो आहे. ज्या ज्या वेळी मी ग्राहकांकडे किंवा सभासदांकडे जातो आणि ठेववृद्धी मासाबद्दल सांगतो, तेव्हा सर्वांकडूनच पतसंस्थेचे आणि या योजनेचे कौतुक होतं. योजनेत सहभागी होण्याऱ्या खातेदारांचे स्वागत करण्यासाठी सर्व शाखांतील अधिकारी आणि कर्मचारी सज्ज असतात. स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेत नेहमीच उत्तम ग्राहकसेवेला प्राधान्य दिले जाते. अधिक मोबदल्यापेक्षाही ठेवींची सुरक्षितता आणि योग्य प्रमाणात व्याज मिळण्याची खात्री हेच संस्थेच्या यशाचे गमक आहे.



**स्वरूप प्रभुदेसाई**
**शाखाधिकारी, कुवारबाव शाखा**
**संपर्क : ७७२००२६२२१**

गेल्या वर्षी मार्केटिंग विभागात काम करताना अनेक नवीन खातेदारांच्या भेटीगाठी घेतल्या. त्या भेटीतून अनेक जुन्या-नव्या खातेदारांनी संस्थेत ठेव ठेवून स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेवरचा विश्वास अधिक दृढ केला. नेहमीप्रमाणेच यंदाही २० जून ते २० जुलै या कालावधीसाठी ठेववृद्धी मास ही लोकप्रिय योजना सुरू झाली आहे. जास्तीत जास्त खातेदारांनी ठेव योजनेत सहभागी व्हावे. तसेच, आणखी नव्या व्यक्तींना सभासद आणि ठेवीदार होण्यासाठी उद्युक्त करावे, अशी विनंती. संस्थेकडील एकूण ठेवींचा टप्पा ५०० कोटींच्या वर नेण्याचे उद्दिष्ट यंदाच्या आर्थिक वर्षासाठी ठेवण्यात आले आहे. त्यात सर्वांनी सहभागी होऊन इतिहास घडवू या. अधिक माहितीसाठी स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेच्या नजीकच्या शाखेला आवर्जून भेट द्या, असे आवाहन करत आहे.

# ठेवीदारांकरिता पर्वणी!

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेमध्ये गुंतवणूक करण्यासाठी ठेववृद्धी मास ही खातेदारांकरिता एक पर्वणीच असते. स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेमध्ये आपले पैसे अत्यंत सुरक्षित राहणार, याबद्दल खातेदारांना दृढ विश्वास आहे. पावस पंचक्रोशीमध्ये आंबा व्यावसायिक, तसेच मच्छिमार व्यावसायिकांची संख्या मोठी आहे. त्यांच्या व्यवसायातून मिळालेल्या नफ्याची रक्कम सुरक्षित राहावी, यासाठी ते स्वरूपानंद पतसंस्थेमध्ये गुंतवणूक करत असतात. पावस पंचक्रोशीमधील मुस्लिम समाजबांधवही पतसंस्थेत वारंवार गुंतवणूक करतात.

एकंदरीतच, संस्थेच्या कामकाजाबद्दल ग्राहकांना प्रचंड विश्वास असून, त्यामुळे केवळ ठेववृद्धी मासातच नव्हे, तर अन्य वेळीही ग्राहक पतसंस्थेत आवर्जून गुंतवणूक करतात. तसेच, वेगवेगळ्या भागांमधील खातेदारांकडून ठेव रक्कम घेण्यासाठी जेव्हा संस्थेचा कर्मचारीवर्ग त्यांची भेट घेतो, तेव्हा स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचे कर्मचारी म्हणून त्यांना खातेदारांकडून विशेष आदराची वागणूक मिळते. तसेच, खातेदार आपल्या संपर्कातील व्यक्तींनाही पतसंस्थेच्या वैशिष्ट्यांची माहिती देऊन त्यांना खातेदार होण्याकरिता प्रवृत्त करतात. संस्थेवर ग्राहकांच्या असलेल्या विश्वासाचे हे प्रतीक आहे. त्यामुळेच पतसंस्थेच्या कामकाजाचा विस्तार होत असून, व्याप्ती सर्वदूर पसरत चालली आहे.



**विशाल सावंत**
**शाखाधिकारी, पावस शाखा**

पतसंस्थेला ॲड. दीपक पटवर्धन साहेबांचे खंबीर नेतृत्व लाभले आहे. त्यांचे अमूल्य मार्गदर्शन आम्हा सर्व कर्मचारीवर्गाला वेळोवेळी लाभतच असते. त्यामुळेच पतसंस्थेचा आजवर उत्कर्ष होत आला असून, पुढेही तो असाच कायम होत राहील, असा विश्वास आहे.



## सेवानिवृत्त खातेदारांसाठी फायदेशीर

मी स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचा सभासद असून, पतसंस्थेची मालगुंडमध्ये शाखा सुरू झाल्यापासून मी संस्थेचा ठेवीदारदेखील आहे. या शाखेमध्ये आर्थिक व्यवहारांसाठी माझे नियमित येणे-जाणे असते. ही पतसंस्था वर्षभर विविध ठेव योजना राबवत असते. परंतु दर वर्षी २० जून ते २० जुलै या कालावधीत असलेली ठेववृद्धी मास ही योजना आमच्यासारख्या सेवानिवृत्त व्यक्तींसाठी विशेष फायद्याची ठरते. कारण या ठेववृद्धी मासामध्ये ठेवींवर दिल्या जाणाऱ्या अधिकच्या व्याजदरांमुळे आमच्यासारख्या सेवानिवृत्त खातेदारांना अधिक परतावा मिळतो. त्यामुळे स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेने हा ठेववृद्धी मास अविरतपणे सुरू ठेवावा, अशी अपेक्षा व्यक्त करून मी संस्थेला शुभेच्छा देतो.!

**– विवेक सदानंद परकर, मालगुंड**

## स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या शाखा

### रत्नागिरी जिल्हा

**रत्नागिरी :** दुसरा मजला, रत्नागिरी मध्यवर्ती एसटी स्टँडसमोर, प्रेसिडन्सी बिझनेस हाउस, रत्नागिरी - ४१५६१२, फोन : (०२३५२) २२१२६३, ९४०३५०६३६३

**मारुती मंदिर :** जोगळेकर संकुल, नाचणे रोड, मारुती मंदिर, रत्नागिरी फोन : (०२३५२) २२३५७७, २९५६३५, ९४२०२९३५७४

**कोकणनगर :** २५, इंदू निवास, कोकणनगर स्टॉप, मजगाव रोड, नूर क्लिनिकशेजारी, रत्नागिरी, फोन : ९४२२५६३६०९

**कुवारबाव :** गाळा नं. ४, वसुंधरा कॉम्प्लेक्स, कुवारबाव, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २९५६१७, ९४२१५४१९११

**पावस :** रबिया कॉम्प्लेक्स, पावस बाजारपेठ, पावस, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २३७००३, २९५८६३, ९४२०४८७०९४

**जाकादेवी :** प्रमिला कॉम्प्लेक्स, तळमजला, जाकादेवी बाजारपेठ, जाकादेवी, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २५१४१८, २९५६६३, ९४०५५७६८२९

**खंडाळा :** अनंत कॉम्प्लेक्स, पहिला मजला, धारकर मेडिकलशेजारी, खंडाळा, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २४३२६३, ९४०५०२५००९

**मालगुंड :** लक्ष्मी भवन, नॉव्हेल्टी स्टोअरसमोर, मालगुंड बाजारपेठ, मालगुंड, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २३५२०२, ९४०५०३७३०८

**पाली :** दळी शॉपिंग सेंटर, पाली बाजारपेठ, पाली, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २९५८५३, ८२७५६७५४४०

**लांजा :** सद्गुरू कृपा, हॉटेल प्रसन्नशेजारी, आठवडा बाजार, लांजा, ता. लांजा, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५१) २९९०६०, ७५८८३००५८३

**राजापूर :** जी-२, दत्तसाई अपार्टमेंट, साई मंदिराजवळ, चव्हाणवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५३) २३२०६३, ९४२२९६३०९३

**नाटे :** श्री. अमोल देवरूखकर यांचे घर, सडापेठ नाटे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५३) २९५८६३, ९४०३०४६५३८

**साखरपा :** जुगाई कृपा, जुना बस स्टँड, साखरपा बाजारपेठ, साखरपा, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५४) २९९१४७, ७५८८६६८११४

**देवरूख :** द्वारा श्री. श्रीरंग शिर्के, आपला बाजारच्या शेजारी, शिवाजी चौक, देवरूख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५४) २६०२६३, ९४२११३८८३०

**चिपळूण :** लक्ष्मी गॅलॅक्सी, साउंड ऑफ म्युझिकसमोर, शिवाजी चौक, चिंचनाका, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५५) २५२७२८, ७५८८९३३८१०

### सिंधुदुर्ग जिल्हा

**देवगड-जामसंडे :** स्वरूप बिल्डिंग, जामसंडे बस स्टॉपजवळ, जामसंडे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग - ४१६६१२, फोन : (०२३६४) २६१२६३, ७५८८९५८७९८

### पुणे जिल्हा

**कोथरूड :** शॉप नं. ३, मेघरंजनी अपार्टमेंट, लेन नं. ६, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११०३८, फोन : (०२०) २५३८५४७०, ९४०४५४८१३८

# चांगल्या परताव्याची काळजी घेणारी संस्था



स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेमध्ये ठेव ठेवताना विश्वासार्हता वाटते. संस्थेकडून व्याजाचा दर ठरवताना चांगल्या परताव्याबाबतची काळजी घेतली जाते. संस्थेच्या ठेवीदारांना भवितव्याबाबत खात्री वाटते. संस्थेच्या सर्व कर्मचारी वर्गाकडून तत्पर सेवा दिली जाते. आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे स्वरूपानंद पतसंस्थेमध्ये शनिवारी जाताना बँकांप्रमाणे दुसरा शनिवार आहे की चौथा शनिवार आहे याचा विचार करावा लागत नाही. कारण रविवार वगळता आठवड्यातील सर्व दिवशी स्वरूपानंद पतसंस्था ग्राहकांच्या सेवेसाठी खुली असते. अशी बहुपयोगी संस्था आमच्या मालगुंड गावात सुरू असल्याचा मला अभिमान वाटतो.

**– दिलीप प्रभाकर बापट, मालगुंड**

# मूर्तिमंत विश्वासाचे प्रतीक



स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था हे नाव म्हणजे मूर्तिमंत विश्वासाचे प्रतीक. आम्ही या पतपेढीमध्ये अनेक वर्षे ठेवी ठेवत आलो आहोत. उत्तम सेवा, पैशांची उत्तम सुरक्षितता आणि उत्तम परतावा या तीन गोष्टी आम्हाला या संस्थेकडे नेहमी आकर्षित करत आल्या आहेत. ही संस्था आमच्यासाठी खरोखर आधार बनली आहे. तिची आणखी भरभराट होण्यासाठी आमच्या खूप खूप शुभेच्छा!

**– साधना किशोर पित्रे, चिपळूण**

# ग्राहकसेवेचा आदर्श!



कर्ज असो वा ठेव, प्रत्येक व्यवहारात प्रामाणिकपणा आणि प्रत्येक सभासदाशी कुटुंबातील सदस्याप्रमाणे वागणूक हीच स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेची ओळख आहे. 'ग्राहक देवो भव' हे तत्त्व प्रत्यक्षात आणणारे सर्व संचालक मंडळ आणि कर्मचाऱ्यांचे अभिनंदन! पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा.

**– सौ. नेहा जोशी (राष्ट्रीय सहसचिव, अखिल भारतीय ग्राहक पंचायत)**

## स्वरूपानंद संस्था एकमेवाद्वितीय!

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या पुणे शाखेचा मी ठेवीदार आहे.



आम्ही राहत असलेल्या डहाणूकर कॉलनी-हॅपी कॉलनी परिसरात स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेसह १५ ते २० राष्ट्रीयीकृत बँका, खासगी बँका, सहकारी बँका, तसेच पतसंस्थांच्या शाखा आहेत. त्यापैकी काही बँकांमध्ये आमच्या कुटुंबाचे बँकिंग व्यवहार आहेत. काही पतसंस्थांच्या ठेवींवरील व्याजदरही जास्त आहेत. तरीही आम्ही स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेत २०१८ साली खाते उघडले आणि नंतर या संस्थेच्या प्रेमातच पडलो. आता आमच्या कुटुंबातील सर्वांची खाती व ठेवी स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेमध्ये आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे शाखेत मिळणारी तत्पर व हसतमुख सेवा. येथील सर्व कर्मचारी मनापासून सहकार्य करतात. 'केवायसी' या तांत्रिक बाबीपेक्षा व्यक्तिगत पातळीवर कर्मचारी व ग्राहक यांचे संबंध कुटुंबाचा एक घटक असावा असेच आहेत. माझ्या सासूबाईंचे वय नव्वदीच्या पुढे असून, मुलगा परदेशात असतो. त्यामुळे आमच्या गरजेनुसार सर्व बँकिंग सुविधा घरपोच मिळते. स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेची दिनदर्शिका आमच्या घराप्रमाणेच डॉ. प्रकाश आमटे यांचे कार्यक्षेत्र असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील हेमलकसा येथील आदिवासी पाड्यांमध्येही पोहोचली आहे. हा सिलसिला गेली तीन वर्षे सुरू आहे. एकंदरीतच पतसंस्थेचे कामकाज अत्यंत समाधानकारक आहे.

**– आनंद राजेशिर्के, पुणे**

## विश्वास, पारदर्शकता आणि उत्कृष्ट आर्थिक शिस्त यांची यशोगाथा

रत्नागिरी जिल्ह्यात सहकार क्षेत्रात स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने



आपल्या कार्याचा एक वेगळा आणि आदर्श ठसा उमटवला आहे. सभासदांचा विश्वास, आर्थिक शिस्त, पारदर्शक कारभार आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांवर उभी असलेली ही संस्था आज जिल्ह्यातील सर्वाधिक विश्वासार्ह सहकारी संस्थांपैकी एक म्हणून ओळखली जाते.

संस्थेच्या यशाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे आर्थिक व्यवस्थापनातील काटेकोरपणा. सहकार क्षेत्रात अनेक संस्थांना थकीत कर्जे आणि 'एनपीए'च्या समस्यांना सामोरे जावे लागते; मात्र स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने नेट एनपीए शून्य राखण्याची उल्लेखनीय कामगिरी केली आहे. थकीत कर्जांचे प्रमाण अत्यल्प असून, प्रभावी कर्ज व्यवस्थापन आणि वेळेवर वसुली यामुळे संस्थेने आर्थिक गुणवत्तेचे उच्च निकष कायम राखले आहेत.

अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांच्या सक्षम, दूरदर्शी आणि अभ्यासपूर्ण नेतृत्वाखाली संस्थेने केवळ आर्थिक प्रगती साधली नाही, तर पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि सभासदाभिमुख सेवा या तत्त्वांनाही सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. संस्थेच्या प्रत्येक व्यवहारामध्ये पारदर्शकता आणि विश्वासार्हता यांचा संगम दिसून येतो. याच गुणांमुळे संस्था सभासदांच्या विश्वासाचे केंद्र





स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था

मर्यादित रत्नागिरी जिल्हा | कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य

प्रेसिडेन्सी बिझनेस हाऊस, २ रा मजला, एस.टी.स्टॅण्डसमोर, रत्नागिरी.

9403 506 363 www.swaroopanandpatsanstha.com

बनली आहे.

गेल्या दोन दशकांमध्ये संस्थेने विविध बचत योजना, मुदत ठेव योजना, गृहकर्ज, शैक्षणिक कर्ज, व्यवसायवृद्धी कर्ज आणि स्वयंरोजगारासाठी आर्थिक साह्य उपलब्ध करून देऊन हजारो कुटुंबांच्या प्रगतीत मोलाचा वाटा उचलला आहे. कोविड साथीसारख्या आव्हानात्मक काळातही संस्थेने स्थैर्य, आर्थिक शिस्त आणि सभासदांप्रति बांधिलकी यांचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले.

संस्थेने सामाजिक क्षेत्रातही आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. शिक्षण, आरोग्य, सामाजिक उपक्रम, पर्यावरण संवर्धन आणि जनजागृती मोहिमांमध्ये संस्थेचा सक्रिय सहभाग राहिला आहे. सहकाराच्या माध्यमातून समाजाच्या सर्वांगीण विकासाची संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचे कार्य संस्थेने सातत्याने केले आहे.

आज स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था ही केवळ एक आर्थिक संस्था नसून, विश्वास, शिस्त, पारदर्शकता आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचे प्रतीक बनली आहे. शून्य नेट एनपीए, अत्यल्प थकीत कर्जे, उत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापन आणि सभासदकेंद्रित कार्यपद्धती या वैशिष्ट्यांमुळे संस्थेने सहकार क्षेत्रात एक आदर्श निर्माण केला आहे. अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली आणि संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी व सभासद यांच्या सामूहिक प्रयत्नांतून संस्थेची ही यशस्वी वाटचाल भविष्यातही अधिक उज्ज्वल होईल. रत्नागिरी जिल्ह्याच्या आर्थिक आणि सामाजिक विकासामध्ये स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे योगदान आगामी काळातही तितक्याच प्रभावीपणे कायम राहील, असा विश्वास वाटतो.

– **मुकुंद मराठे, रत्नागिरी** (चार्टर्ड अकाउंटंट)

## पारदर्शक व्यवहार, उत्तम सेवा

स्वामी स्वरूपानंद पतसंस्था ही विशेषतः कोकणातील एक अग्रगण्य, नामांकित संस्था आहे. संस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन गेली २६ वर्षे समर्थपणे संस्थेची धुरा वाहत आहेत. अचूक निर्णय, उत्तम ग्राहक सेवा, नियमांच्या चौकटीत राहून कर्जव्यवहार आणि सर्व पारदर्शक व्यवहार ही संस्थेची वैशिष्ट्ये आहेत. ठेवी, कर्जे, गुंतवणूक, स्वनिधी या सगळ्या बाबी वृद्धिंगत होत आहेत. संस्थेने रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून सर्व निकषांची पूर्तता केली आहे. संस्थेच्या ठेवी, कर्जे आणि नफा चढ्या क्रमाने वाढत असून, संस्था ग्राहकांना उत्तम लाभांश देत आहे. संस्थेचा कर्मचारीवर्ग हा संस्थेचा कणा असतो. ते उत्तम ग्राहक सेवा देतात. त्यामुळे संस्थेचे भवितव्य उज्ज्वल आहे. संस्थेच्या १७ शाखा असून, त्यापैकी आठ शाखा स्वतःच्या मालकीच्या जागेत आहेत. यातून संस्थेची प्रगती दिसते. 'सहकार स्वरूप' या नियतकालिकातून संस्थेच्या प्रगतीचा आलेख सर्वांपर्यंत पोहोचतो.



– **विजय भागवत, चिपळूण**

('बँक ऑफ महाराष्ट्र'चे निवृत्त व्यवस्थापक)

## सुरक्षिततेचा विश्वास

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेशी माझा प्रत्यक्ष संबंध आला तो लांजा शाखा सुरू झाल्यानंतर. त्यापूर्वी या संस्थेच्या कारभाराविषयी फक्त ऐकून होतो. त्याची प्रचीती पतसंस्थेत खाते उघडल्यापासून आजतागायत येत आहे. संस्थेचा नेट एनपीए शून्य आहे. त्यावरून संस्थेच्या चोख कारभाराची कल्पना येते. आपल्या ठेवी या पतसंस्थेत सुरक्षित आहेत आणि पुढेही सुरक्षित राहतील हा एक प्रकारचा विश्वासदेखील ग्राहकांच्या मनामध्ये निर्माण होण्यात यातून मदत होते. उत्कृष्ट, तत्पर सेवा हा वारसा जपण्याचा प्रयत्न या संस्थेतील कर्मचारी सतत करताना दिसत असतात. संस्थेचे संचालक मंडळ, तसेच कर्मचारीवर्ग या पतसंस्थेला निश्चितपणे यापुढेही अशाच प्रकारे शिखरावर नेण्याचे काम करील यात शंका नाही.



– **सुरेश श्रीराम पाध्ये, लांजा**

## ग्राहकहित पाहणारी संस्था

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचा मी सभासद आहे. अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांचे खंबीर आणि शिस्तबद्ध नेतृत्व आणि पदाधिकाऱ्यांचे सहकार्य यांतून संस्थेने केलेली प्रगती कौतुकास्पद आहे. सर्वसामान्य माणसांच्या अडीअडचणीच्या वेळी त्यांच्या परिस्थितीकडे न पाहता प्रामाणिकपणावर विश्वास ठेवून मदत करण्यासाठी संस्थेच्या सर्व शाखांचे कर्मचारी अग्रेसर असतात. त्यामुळेच अनेक जण कुटुंबाप्रमाणे संस्थेशी जोडले गेलेले आहेत. 'ही संस्था माझी आहे, ती उत्तम प्रकारे चालली पाहिजे' अशी भावना प्रत्येक ग्राहकाच्या मनात असल्याने संस्थेची थकीत कर्जे अत्यल्प आहेत. ३१ मार्च अर्थात आर्थिक वर्षाच्या अखेरच्या दिवशी ताळेबंद मांडणे हेसुद्धा संस्थेवरील ग्राहकांच्या विश्वासाचे एक महत्त्वाचे कारण आहे. संस्थेत ठेव ठेवण्यास गेल्यानंतर नजीकच्या भविष्यकाळात ठेववृद्धी मास येणार असेल, तर ग्राहकांना अधिक व्याजदराचा फायदा होण्यासाठी योग्य तो सल्ला दिला जातो. ठेववृद्धी मासाचे कालावधी ठरलेले असल्याने मुदत ठेवी ठरावीक काळासाठी ठेवण्याचा सल्लाही दिला जातो. एकंदरीतच संस्था प्रत्येक गोष्टीत ग्राहकहित पाहते. संस्थेच्या प्रगतीचा आलेख असाच उंचावत राहो, यासाठी खूप शुभेच्छा!



– **गिरिधर पटवर्धन, रत्नागिरी** (जागृत ऑइल डेपो)

## दरवर्षी ठेव ठेवतो!

मी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमधून सेवानिवृत्त झालो असून, माझे वय ६२ वर्षे आहे. माझी पत्नी शिक्षिका आहे. सुरुवातीला पतसंस्थेच्या रत्नागिरी शाखेत माझे खाते होते. राजापूर शाखा सुरू झाल्यावर मी ते इथे बदलून घेतले. अतिशय आपुलकीची आणि विश्वासार्ह सेवा हे या पतसंस्थेचे अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. ग्राहकांना चांगला व्याजदर मिळावा, या दृष्टीने व्यवस्थापक आणि कर्मचारी योग्य योजनांबद्दल मार्गदर्शन करतात. २० जून ते २० जुलै या ठेववृद्धी मासात मी दर वर्षी मला जमेल तेवढी ठेव ठेवतो. मी, पत्नी आणि मुलगा अशा तिघांच्याही नावावर ठेवी असल्याने आम्हाला संस्थेने खास सर्टिफिकेटही दिले आहे.



- **सुधाकर करंबेळकर, राजापूर**



# षष्ट्यब्दीपूर्तीचा हृद्य सोहळा...!

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक मनोहर पटवर्धन यांना 27 मे 2026 रोजी 60 वर्षे पूर्ण झाली. त्यांच्या वाढदिवसानिमित्त पतसंस्थेच्या प्रधान कार्यालयात एक छोटासा, हृद्य सोहळा झाला. त्या वेळी त्यांचे कुटुंबीय, पतसंस्थेचे अधिकारी-कर्मचारी यांच्यासह त्यांचे अनेक स्नेही उपस्थित होते. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी ॲड. पटवर्धन यांना शुभेच्छा दिल्या. त्या सोहळ्यातील ही निवडक क्षणचित्रे...



आरडीसीसी बँकेचे संचालक जितेंद्र साळवी आणि कर्मचारी



आरडीसीसी बँकेचे संचालक सचिन भिंगार्डे आणि महेश खामकर



कुटुंबीयांसह...



औक्षण करून अभीष्टचिंतन



पतसंस्थेचे अधिकारी आणि कर्मचारी



पतसंस्थेचे अधिकारी आणि कर्मचारी



पतसंस्थेचे पिग्मी एजंट



प्रवीण देसाई, रत्नागिरीचे उपनगराध्यक्ष समीर तिवरेकर, सचिन करमरकर, सुशांत (मुन्ना) चवंडे



बांधकाम व्यावसायिक रूपेश साळवी



भाजप पदाधिकारी



पतसंस्थेचे संचालक जयप्रकाश पाखरे, प्रसाद जोशी, संतोष प्रभू



सारस्वत बँकेचे अधिकारी

500 कोटी ठेवींचे लक्षपूर्तीच्या प्रवासात सहभागी व्हा!


ॲड.दीपक पटवर्धन
अध्यक्ष

ठेव वृद्धी मास : 20 जून ते 20 जुलै 2026

स्वरूपांजली ठेव
12 ते 18 महिने
8.75% (सर्वसाधारण)

9% (ज्येष्ठ नागरिक/महिला)

सोहम ठेव योजना
19 ते 36 महिने
( मासिक व्याज )
8.50% (सर्वसाधारण) 8.75% (ज्येष्ठ नागरिक/महिला)

- विश्वासार्ह संस्था
- सुरक्षित ठेव
- आकर्षक व्याजदर

स्वामी स्वरूपानंद सह.पतसंस्था
मर्यादित रत्नागिरी जिल्हा | कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य

प्रेसिडेन्सी बिझनेस हाऊस,
२ रा मजला, एस.टी.स्टॅण्डसमोर, रत्नागिरी.

मो. नं. 9403 506 363
www.swaroopanandpatsanstha.com